# रत्नागिरी नगरपरिषद,रत्नागिरी यांचे कार्यालयातील पदभरतीसाठी जाहिरात
## जाहिरात - चौथी मागणी

क्र.आस्थापना-१/पदभरती/लिपीक-टंकलेखक(अपंगअनुशेष)/सीआर-०२/२०१० दिनांक **१६/०२/२०१०**

रत्नागिरी नगरपरिषद कार्यालयाच्या आस्थापनेवर अपंगासाठी राखीव असलेले रिक्त पद भरण्यासाठी खाली नमूद केलेल्या प्रवर्गातील उमेदवारांकडून **दिनांक १०/०३/२०१०** पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**१. पदांचा तपशिल -**

| अ.क्र. | पदाचे नांव | प्रवर्ग | पद | पैकी समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १ | **लिपीक टंकलेखक** | खुला | १ | **अपंग** (अल्पदृष्टि, कर्णबधीर, अस्थिव्यंग) किमान ४०/. |
| एकूण पद संख्या १ | | | | |

**२. वेतनश्रेणी -** रुपये ३०५०-७५-३९५०-८०-४५९० अधिक नियमानुसार देय भत्ते (दोन्ही पदांसाठी) (असुधारीत)

**३. पात्रतेच्या अटी :-**

**३.१** वयोमर्यादा - **(दिनांक २८ - २ -२०१० रोजीची गणली जाईल)**

**३.१.१** उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षे असावे.

**३.१.२** उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम —

(**एक**) अपंग उमेदवारासाठी वयोमर्यादा ४५ वर्षा पर्यन्त.

**३.२** लिपीक टंकलेखक **किमान शैक्षणिक अर्हता - (दिनांक २८ - २ -२०१० रोजी पूर्ण केली असली पाहिजे)**

**३.२.१** किमान उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. पदवीधारकांना प्राधन्य
**३.२.२** एम एस सी आय टी किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)

**३.२.३** मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक. टंकलेखनाचे शासनमान्य संस्थेचे प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)
३० श.प्र.मि.मराठी ,
४० श.प्र.मि.इंग्रजी

४. **शुल्क -**

**४.१ रक्कम रुपये १५०/-**

**सदरचे परीक्षा शुल्काचा कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) "मुख्याधिकारी रत्नागिरी नगरपरिषद" या नावाने काढण्यात यावा. विहीत परीक्षा शुल्काचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) अर्जासोबत सादर केला नाहीतर अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.धनादेश व रोख रक्कम स्वीकारली जाणार नाही.**

**५. <u>परीक्षेचे स्वरुप</u> अ :- लिपीक-टंकलेखक पदाकरिता**

लिपीक-टंकलेखक पदाकरिता कमीत कमी अर्हता उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १२ वी) आहे. अशा लिपीकवर्गीय पदांकरीता लेखी परीक्षेचा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील शालांत परीक्षेच्या दर्जासमान असेल. लेखी परीक्षेसाठी मराठी,इंग्रजी,सामान्य ज्ञान व अंकगणित या प्रत्येक विषयांवर ५० गुणांचे वस्तूनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न असतील. एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. सदर परीक्षा इंग्रजी परीक्षा वगळता अन्य विषयांची परीक्षा मराठी भाषेतून घेण्यात येईल.

**६.** गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणांच्या (२०० पैकी) किमान ९० गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

**७.** परीक्षेचा निकाल तयार करताना परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम खालील निकषांवर क्रमवार लावला जाईल.

**७.१** अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार

**८.** स्पर्धा परीक्षा रत्नागिरी केंद्रावर घेण्यात येईल.

**९. अर्जदाराने अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या <u>साक्षांकीत प्रती</u> जोडणे बंधनकारक आहे.**

**९.१** उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (एच.एस.सी.) अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र

**९.२** शाळा सोडल्याचा दाखला

**९.३** मराठी टंकलेखनाची एका मिनिटाला किमान ३० शब्द व इंग्रजी ४० शब्द या गतीची शासकीय वाणिज्य मंडळाची परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र.

**९.४** अपंग प्रवर्गातील उमेदवाराने अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकीत्सक/वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती,तथापी याबाबत विशेष वैद्यकीय मंडळाच्या तपासणीचा वैद्यकीय अहवाल अंतिम समजला जाईल. सोबत लेखी परीक्षेच्या वेळी लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास अर्जात तसा स्पष्ट उल्लेख करावा. परीक्षेसाठी लेखनिक अनुज्ञेय राहील. अर्जदाराला लेखनिकाची आवश्यकता असल्यास तसे त्याने अर्जात नमूद करावे. लेखनिक या कार्यालयाकडून पुरविण्यात येईल.

**१० <u>पात्रतेनंतरच्या अटी व शर्ती -</u>**

**१०.१** नियुक्ती होणा-या उमेदवारास शासन निर्णय दिनांक १ नोव्हेंबर,२००५ नुसार लागु करण्यात आलेले अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागु राहील.

**१०.२** निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे नंतर निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

**१०.३** अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना रुजू झाल्यानंतर विहीत केलेल्या विभागीय दुय्यम सेवा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**१०.४** मुळ प्रमाणपत्रांची खातरजमा केल्यानंतरच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी रुजू करुन घेण्यात येईल.

**१०.५** महाराष्ट्र नागरी सेवा नियम (लहान कुटुंबांचे प्रमाणपत्र) नियम २००५ नुसार माहिती सादर करणे आवश्यक आहे.

**१०.६** महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय,मुंबई पत्र क्रमांक अपंग २००२/प्र.क्र. ३३१/सुधार -३ दिनांक -१४ जानेवारी २००७ अन्वये अपंग कायदयाच्या अंमलबवणीसाठी करण्यात आलेल्या जनहित याचिका क्रमांक ७०/०२ व १२९/०३ यांच्या निर्णयानुसार जाहिरातीतील संवर्गाची पदांची संख्या कमी अगर सर्व रद्द होईल या अटीच्या अधीन राहून भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

**१०.७** भरती प्रक्रियेच्या संदर्भात ज्काही तक्रारी मतभेद निर्माण झाल्यास -यायालयीन अधिकारज्क्षेत्र रत्नागिरी शहर -यायालयाच्या ज कक्षेतच राहील.

**१०.८** न.प संचलनालया कडून विभागीय परिक्षा विहीत केली गेली नसल्याने सेवेत दाखल झाल्यानंतर अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे **LGS** प्रमाणपत्र एक वर्षाचे आंत सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा नियुक्ती रद्द करणेत येईल.

११. **विशेष सूचना :-**

**११.१** फक्त याच जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहीत मुदतीत या कार्यालयास प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी याकार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**११.२** पदांमध्ये तसेच प्रवर्गामध्ये बदल करण्या संदर्भात निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा, अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, रत्नागिरी यांचे राहतील.

**११.३** उमेदवाराने आपले अर्ज **मुख्याधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा निवड समिती व्दारा रत्नागिरी नगरपालिका कार्यालय,जयस्तंभ,रत्नागिरी ४१५६१२** या पत्यावर **दिनांक १० /३ /२०१०** पूर्वी रजिस्टर पोस्टव्दारे पाठवावे किंवा समक्ष सादर करावेत. सोबतच्या नमुन्यातील अर्ज ए-४ साईजच्या पांढ-या को-या कागदावर टंकलेखीत/हस्तलिखीत सादर करता येतील, मात्र खाडाखोडीच्या ठिकाणी स्वाक्षरी करणे आवश्यक राहील.अर्जाचे पाकिटावर ठळक अक्षरात पदाचा व उमेदवारांच्या संवर्गाचा उल्लेख करावा.उमेदवारांने आपले अर्जासोबत रिकामा लखोटा (साईज १०.५०**X**४.५० इंच) व त्या लखोटयावर स्वतःचे संपूर्ण नांव व पत्ता नमूद करावा.तसेच रिकाम्या लखोटयावर रु.५/-चे पोस्टाचे तिकीट चिकटवावे.

**११.४** अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर (कार्यालयीन वेळेनंतर) प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**११.५** कोणीही उमेदवारांनी प्रमाणपत्रांच्या/दाखल्यांच्या मूळ प्रती जोडू नयेत. साक्षांकित छायाप्रती जोडाव्यात.

**११.६** अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

**११.७** निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किंवा नवीनसूची तयार करण्यासाठी सेवा भरतीची जाहिरात देण्यात येईल, त्या दिनांकापर्यत या पैकी जो दिनांक आधी घडेल त्या दिनांकापर्यत विधीग्राह्य ठरले. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

**११.८** प्रत्येक उमेदवाराने वर नमुद केलेल्या पात्रतेच्या सर्व अटी (जे लागू आहेत) बाबत चे विहीत केलेले दाखले/कागदपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा त्या संवर्गासाठी अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

**११.९** परिक्षेचा दिनांक, स्थळ व वेळ या बाबी अर्हता धारक उमेदवारांस प्रवेष पत्राद्वारे कळविण्यात येतील. त्याचप्रमाणे रत्नागिरी जिल्ह्याच्या वेबसाईट क्र. www.ratnagiri.gov.in व www.ratnagirinagarparishad.org वर तसेच स्थानिक वर्तमानपत्रात याबाबतची माहिती प्रसिध्द करण्यात येईल.

**१२)** परिक्षेच्या वेळापत्रकामध्ये अपरिहार्य कारणास्तव बदल होऊ शकेल.

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा
मुख्याधिकारी
रत्नागिरी नगर परिषद

# अर्जाचा नमूना

| उमेदवाराने पासपोर्ट साईज फोटो येथे लावावा |
|---|

**जाहिरातीतील पद क्रमांक** अर्जाचा कार्यालयीन क्रमांक

--------------------------------

---------------------------------

प्रति,

**मा. मुख्याधिकारी तथा,**
**सदस्य सचिव**
**जिल्हा निवड समिती,**
**व्दारा रत्नागिरी नगर परिषद, रत्नागिरी ४१५ ६१२**

लिपीक टंकलेखक या पदासाठी अर्ज
(अपंगअनुशेषांतर्गत अल्पदृष्टि,कर्णबधीर, अस्थिव्यंग)
(उमेदवाराने योग्य त्या प्रवर्गावर (✓ अशी खुणा करावी.)

जाहिरातीचा क्रमांक व दिनांक :-

-----------------------------------------------------------------------------------

१) **संपूर्ण नांव** आडनांव स्वत:चे नांव वडिलांचे/पतीचे नांव

-----------------------------------------------------------------------------------

दोन्ही भाषेत मराठीत

-----------------------------------------------------------------------------------

इंग्रजीत

-----------------------------------------------------------------------------------

२) **पत्र व्यवहाराचा पत्ता** (पीनकोडसह)

मराठीत

-----------------------------------------------------------------------------------

इंग्रजीत

-----------------------------------------------------------------------------------

३) **दुरध्वनी क्रमांक :-** **मोबाईल क्रमांक :-**

**खालीलपैकी लागू असलेल्या ठिकाणी (✓)अशी खूण करावी.**

४) अर्जदार कोणत्या प्रवर्गाचा आहे.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज. (क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इमाव | (खुला) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

५) लिंग (पुरुष)/(स्त्री )

-----------------------------------------------------------------------------------

६) वैवाहीक स्थिती (विवाहित)/( अविवाहित)

-----------------------------------------------------------------------------------

७) अर्जदाराचे अपंगाबाबतचा तपशील

७(अ) जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडील प्रमाणपत्र क्रमांक ------------------

७(अ ) अस्थिव्यंग उमेदवाराला (होय)/(नाही)

लेखनिकाची आवश्यकता आहे काय ? --------------------------------

८) (अ) अर्जदाराची जन्मतारीख (आकड्यात)    दिनांक    महिना    वर्ष

(ब) दिनांक - -२०१० रोजी होणारे पूर्ण वय -
(अंकात)

९)

| **अर्जदाराची शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परीक्षांचा तपशिल)** | **तांत्रिक विद्यालय/विद्यापिठ परिक्षा मंडळाचे नांव(शाखा व विषय नमूद करावे)** | **उत्तीर्ण झाल्याचे वर्ष** | **मिळालेल्या गुणांची टक्केवारी** |
|---|---|---|---|
| अ) माध्यमिक /उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी./ एच एस.सी) | | | |
| ब ) अतिरिक्त शैक्षणिक अर्हता (जसे ./पदवी/ पदव्युत्तर पी.एच.डी) असेल तर ते विषयांसह नमूद करावे. | | | |
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

**<u>१०) पूर्वानुभव -</u>**

कार्यालयाचे नांव व पत्ता :    पदनाम    नोकरीचा कालावधी

**टीप :- पूर्वानुभव असल्यास संबंधित कार्यालयाकडील/संस्थेंकडील दाखला जोडणे आवश्यक राहील.**

११) इतर अर्हता

**<u>ब) संगणक अर्हता</u>**

(माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने विहीत केलेली खालील परिक्षा उत्तीर्ण आहे/नाही. लागू असलेल्या ठिकाणी (✔) अशी खुण करावी.

१) महाराष्ट्र राज्य व उच्च व तंत्रशिक्षण मुंबई यांचेकडील **M S - C I T** प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण आहे/नाही

**<u>१२) (परीक्षा) शुल्क</u>**

अ) डिमांड ड्राफ्ट परीक्षा शुल्क (फी) रक्कम रु. -

ब) डिमांड ड्राफ्ट क्रमांक व दिनांक :-

जाहिरातीत नमूद केलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून या अटी व शर्तीचा भंग केल्यास भरतीच्या कुठल्याही टप्प्यामध्ये माझी उमेदवारी रद्द होईल याची मी समज घेतली आहे. अर्जात नमूद केलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी व बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता आणि/अनुभव माझ्यापाशी आहे. मी आणखी असे प्रमाणित करतो/ करते की, वर दिलेली माहिती खोटी व चुकीची आढळून आल्यास खोटया माहितीच्या आधारे मिळालेली उमेदवारी किंवा निवड/ नियुक्ती रद्द होण्यास पात्र राहिल. नोकरी गमावण्यास मी पात्र राहीन व त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार रहाणार नाही.

दिनांक :-

स्थळ :- **(अर्जदाराची सही)**

**<u>महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ मधील प्रतिज्ञापनाचा</u>**
**<u>नमुना- अ</u>**

**<u>प्र ति ज्ञा प त्र</u>**
**नमुना - अ**
**(नियम ४ पहा)**

मी श्री./श्रीमती/कुमारी

श्री. यांचा/यांची मुलगा/मुलगी

/पत्नी, वय वर्षे राहणार,

याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो/ करते की,

(१) मी या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

(२) आज रोजी मला (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या
आहे. (असल्यास,जन्मदिनांक नमूद करावा.)

१)

२)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च,२००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलांमुळे या पदसाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण -

(अर्जदाराची सही)

दिनांक -

## परिशिष्ट - अ

**(जोडलेली प्रमाणपत्रे/दाखले)**

**१) खालील कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रती जोडले असल्यास (✔ ) मध्ये अशी खूण करावी.**

| | |
|---|---|
| १) जन्मतारखेचा दाखला | (   ) |
| २) शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र व गुणपत्रिका | (   ) |
| ३) मराठी टंकलेखनाची एका मिनिटाला किमान ३० शब्द या गतीची व इंग्रजी टंकलेखनाची एका मिनिटाला किमान ४० शब्द शासकीय वाणिज्य मंडळाची परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र | (   ) |
| ४) संगणक परिक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र | (   ) |
| ५) अपंगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्र. ( किमान ४०%) | (   ) |
| ६) कुटुंब मर्यादीत असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र (नमूना - अ) | (   ) |
| ७) अर्ज करणारा उमेदवार शासकीय/निमशासकीय सेवेत कार्यरत असेल तर अशा उमेदवारांने संबंधित कार्यालयाच्या नियुक्ती प्राधिका-यांची पूर्वपरवानगीचे पत्र. | (   ) |
| ८) पूर्वानुभवाचा दाखला | (   ) |

**२) डिमांड ड्राफ्ट अर्जासोबत सादर केला असल्यास (✔ ) अशी खूण करावी.**

| | |
|---|---|
| १) डिमांड ड्राफ्ट (परीक्षा शुल्क) | (   ) |

# **लेखी परीक्षेचे वेळापत्रक**

| अ.क्र | पदनाम | अर्ज स्वीकारण्याचा अंतीम दिनांक | प्रवेशपत्र वितरणाचा कालावधी | लेखी परीक्षा दिनांक व वेळ व स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | लिपीक टंकलेखक | १०/३/२०१० | १७/३/२०१० ते १८/३/२०१० | रविवार दिनांक २१/३/२०१० स्थळ- गोगटे जोगळेकर महाविद्यालय,रत्नागिरी सकाळी ११.०० ते १२.३० |